# व्यवहार कौशल्ये आणि शिव-समर्थ युग

महापुरुषांचे विचार हे युगप्रवर्तक असतात. त्यांचे विचार प्रत्येक काळात प्रेरक तर असतातच पण त्याचबरोबर येणाऱ्या प्रत्येक पिढीला मार्गदर्शकही ठरतात. खरं तर व्यक्तीला नव्याने जगण्याचा अर्थ शोधण्यास प्रवृत्त करतात. छ. शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास यांचा येथे उल्लेख अभिप्रेत आहे. काळाच्या पुढे जाणारे, प्रत्येक काळाशी आपले नाते सांगणारे असे हे युगपुरुष. यांच्या विचारांनी, कर्तृत्वाने नेहमीच काळाच्या सीमेला बाजूला करून नव्यापिढीला, येणाऱ्या भविष्याला उत्स्फूर्त असे देऊ केले आहे. म्हणून काळ हा केवळ यांच्यासाठी निमित्त ठरला.

समकालीन जगणे हे फार गुंतागुंतीचे आहे. या समकालीन वास्तवाला समजून घेताना व्यक्ती आपले स्वत्व तरी हरवत नाही ना? असा प्रश्न समोर उभा आहे. आज निश्चितच जगण्याचे परिमाण बदलले आहे. स्वत:पुरती चौकट आखून जरी आपण जगत असलो तरी विश्वाचे भान आपल्याला बाजूला करता येत नाही. नेमकी याच ठिकाणी आपली गोची होते. आजच्या वास्तवात जगताना या साऱ्या गुंतागुंतीमध्ये व्यक्ती म्हणून पडणाऱ्या अनेक प्रश्नांना उत्तरे देण्याचे सामर्थ्य वरील महापुरुषांच्या विचारात आहे. माझा विषय व्यवहार कौशल्ये आणि शिव-समर्थ युग असा आहे. आजच्या काळाच्या संदर्भात समर्थ रामदास यांच्या 'दासबोध' या ग्रंथात तर रामचंद्रपंत अमात्य लिखित 'आज्ञापत्र' या ग्रंथातून आढळणारे व्यवहारज्ञान हे आपल्याला आपल्या प्रत्यक्ष आयुष्यात कसे वापरता येईल याविषयीचे विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

तत्त्वज्ञान, परमार्थ, भक्ती, व्यवहारज्ञान इ. अनेकविध अंगांचे दर्शन समर्थ रामदास यांच्या 'दासबोध' या ग्रंथातून घडते. वेगवेगळ्या कालखंडात अभ्यासकांनी दासबोध या ग्रंथाचा वेगवेगळ्या अंगाने विचार केलेला आहे. प्रत्येक काळात दासबोधातील या विचारांनी समाजाला मार्गदर्शन तर केलेच पण त्याचबरोबर मानवी जगण्याकडे पाहण्याचा एक वेगळा दृष्टिकोनही दिला. आजच्या काळात तसेच पुढे भविष्यातही या ग्रंथाच्या माध्यमातून समर्थ रामदासांचे विचार समाजाला योग्य दिशा दाखवतील. समर्थांनी इ.स. १६६० साली 'दासबोध' हा ग्रंथ पूर्ण केला. केवळ अध्यात्म सांगणे हा या ग्रंथाचा हेतू नाही. या ग्रंथातील २० दशकामधून जीवनातील सर्व विषयांचे दर्शन समर्थांनी घडविले आहे. कोणताही विषय वर्ज्य केलेला दिसत नाही. मानवी व्यवहारातील सगळ्या अंगांना स्पर्श केलेला आहे. दासबोधात सांगितलेले व्यवहारज्ञान आजच्या काळालाही तितकेच समर्पकपणे लागू पडते. समर्थांच्या लेखी प्रपंच आणि परमार्थाला असलेले महत्त्व, मानवाने व्यवहार करताना घ्यावयाची दक्षता, माणूस म्हणून जगताना त्याच्याकडे कोणते गुण असावेत, कोणत्या दोषांना बाजूला करावे, आत्मसंतुष्ट असू नये, सावधानतेला असणारे महत्त्व, शरीराला

अवाढव्य महत्त्व दिल्यामुळे होणारे नुकसान, अल्पज्ञानामुळे होणारे तोटे, कष्टाचे महत्त्व, माणूस म्हणून आणि समाजात वावरताना व्यक्तीचे आचरण कसे असावे, आशावादी दृष्टिकोन जोपासावा, माणसाने नेहमी प्रयत्नवादी असावे, तारतम्य राखून वागावे इ. अनेक गोष्टींनां दासबोधाने स्पर्श केला आहे. व्यक्तीच्या स्वभावातील सूक्ष्म धागेदोरे अगदी त्यातील बारकाव्यासहित समर्थ सांगतात. त्यामुळे प्रत्यक्षात व्यवहार करताना कोणत्या गोष्टी ध्यानात घ्याव्यात आणि कोणत्या गोष्टींचा त्याग करावा याविषयी त्यांनी सांगितलेली कौशल्ये कोणत्याही काळात व्यक्तीला प्रत्यक्ष आयुष्यात उपयुक्त तर आहेतच पण त्याचबरोबर एक व्यक्ती म्हणून आदर्श आयुष्य कसे जगावे याविषयीचा मूलमंत्र सांगणारी आहेत. रोजच्या व्यवहारातील दाखले देत, समाजाचे सूक्ष्म निरिक्षण करत समर्थ वाचकांना वरील गोष्टी पटवून देतात. ही सारी कौशल्ये आजच्या प्रत्यक्ष जगण्यासाठी महत्त्वाची असल्याने काळाच्या पलीकडे जाणारा हा ग्रंथ ठरतो.

परमार्थाबरोबर प्रपंचाला समर्थांनी समांतर पातळीवर आणले 'विवेकवैराग्य' या दशकातील पहिल्या समासात त्यांनी प्रपंचाला दूर सारून केवळ परमार्थ केला तर कोणत्या परिस्थितीला सामोरे जावे लागेल याचे दर्शन घडविले. केवळ परमार्थ केल्याने काय होईल याचेही वास्तव सांगतात.

*'परमार्थ सोडून प्रपंच करिसी। तरी तू यमयातना भोगिसी।'*

केवळ परमार्थ करीत घरी बसल्याने पोट कसे भरणार? असा प्रश्न ते विचारतात. त्यामुळेच मानवाला परमार्थ आणि प्रपंच दोन्ही साधता आले पाहिजे.

*'प्रपंच परमार्थ चालवाल । तरी तुम्ही विवेकी।'*

माणसाने नेहमी सावधानता, खबरदारी, दक्षता बाळगणे गरजेचे आहे. भक्ती, अध्यात्म, प्रपंच, व्यवहार, राजकारण इ. सगळ्याच ठिकाणी सावधानता महत्त्वाची आहे. आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या काळात तर नवनव्या समस्यांना आपल्याला सामोरे जावे लागते आहे. या काळात प्रत्येक गोष्टीपासून आपण सतर्क, सावधान, दक्ष राहिलो तर आपल्याला त्यातून उद्‌भवणाऱ्या दुष्परिणामांपासून स्वतःचा बचाव करता येईल. आपल्या रोजच्या व्यवहारातील सावधानतेविषयीचे गांभीर्य, महत्त्व दोन्ही समर्थांनी त्या काळात अतिशय समर्पकपणे सांगितले आहे.

*'खबरदार सुखी असतो। बेखबर दुःखी असतो.।'*

सावधान असणाराच श्रेष्ठ ठरतो. त्याच्यावर पश्चात्तापाची वेळ येत नाही. सावधानता बाळगली नाही तर कधी कोणते संकट येईल हे सांगता येणार नाही. पुढे ते सावधान असणाऱ्या, प्रत्येक गोष्टीकडे सतर्कपणे पाहणाऱ्या माणसाची संगती करण्यास सांगतात. सावधान असणाऱ्या, दूरदृष्टी ठेवून वागणाऱ्या, उद्योगी असणाऱ्या माणसाचा विवेक पहावा,

त्याची संगत करावी पण असे करताना त्याचे मन दुखावणार नाही याची काळजी घ्यावी. रोजच्या व्यवहारात माणसाने शहाणपणाने वागावे.

*'सावधानता असावी । नीतीमर्यादा राखावी ।*
*जनास माने ऐसी करावी । क्रियासिद्धी ।'*

समर्थ प्रत्येक गोष्टीतील तार्किकता, प्रत्यक्षता पटवून देतात. कोणत्याही गोष्टीविषयीचे मत सांगताना चांगली आणि वाईट अशा दोन्ही बाजू ते मांडतात. त्यासाठी रोजच्या व्यवहारातीलच ते दाखले अगदी समर्पकपणे देतात. त्यांचे सहजपणे पण तितक्याच परखडपणे मांडलेले विचार हेच दासबोधाचे वैशिष्ट्य ठरते. यासंदर्भात न.र.फाटक म्हणतात, 'समर्थांच्या अंतरंगात एखादा विषय स्फुरल्यास त्याची मांडणी करताना त्याचे समग्र रूप जिज्ञासूला दिसण्याकरीता ते आपले ज्ञानभांडार भरगच्च उघडतात.' याची प्रचिती त्याच्या सर्वच समासासंदर्भात येते.

आयुष्यात आळसामुळे नुकसानच होते. त्यामुळे आळसाला बाजूला करून माणसाने कार्यतत्पर, उद्योगी रहावे असे समर्थ सांगतात. आळसामुळे व्यक्तीला कोणत्या परिस्थितीला सामोरे जावे लागते याचे वास्तव चित्र समर्थ मांडतात. आळसाने आळस वाढत जावून कारभार बुडतो, आळसाने नशिबी करंटेपणा येतो. आळसाने आचार बुडतो, विचार करता येते नाही असे ते पुन्हा-पुन्हा बजावून सांगतात. त्यामुळे माणसाने आळस सोडून कार्य करावे. कार्यतत्पर असणाऱ्या व्यक्तीला वैभव तर प्राप्त होतेच आणि समाधानही लाभते.

*'साक्षेप करिता कष्टती । परंतु पुढे सुरवाडती ।*
*खाती जेविती सुखी होती । यत्नें करूनी ।'*

'मुर्खलक्षणनाम' या समासात मुर्खांची लक्षणे सांगताना व्यावहारिक शहाणपणाही सांगितला आहे. समर्थांच्या मते दूरदृष्टी ठेवून, उत्तमगुणांचा स्वीकार करून जो जगतो तो शहाणा. दुबळेपणा, आळस माणसाला आलेल्या परिस्थितीला सामोरे जाण्यापासून रोखतात. उत्तम गुण नसल्यामुळे नशिबी येणाऱ्या करंटेपणाची मोठीच्या मोठी यादीच देतात. उदा. दुबळा, आळशी, मुर्ख, अव्यवस्थित, अंगावर वस्त्र नाही, राहायला खोपटसुद्धा नाही इ. व्यक्तीकडे उत्तम गुण नसल्यामुळे त्याला कोणत्या परिस्थितीला सामोरे जावे लागते याचे दर्शन घडवितात. म्हणूनच माणूस म्हणून जगताना उत्तम गुणांचा व्यवहारात उपयोग करून घेणे गरजेचे आहे. विद्या, बुद्धी, विवेक, कुशलता इ. उत्तम गुणांचे आचरण करून जगता आले पाहिजे. उत्तम गुण असणाऱ्या लोकांची समाजाच्या विकासासाठी गरज असते. उत्तमगुणांमुळे एखाद्या व्यक्तीला चांगले भाग्य तर लाभतेच पण ती व्यक्ती लोकांनाही प्रिय होते.

*'जो उत्तम गुणे शोभिला । तोचि पुरुष महाभला ।*
*कित्येक लोक तयाला । शोधीत फिरती ।'*

माझे, मीपणा यांना स्थान असणाऱ्या माणसांच्या आयुष्यात केवळ दुःख येते. आयुष्याला योग्य दिशा दिली तरच त्याचे सार्थक होते. पण हे माणसाला कळत नाही. खरे तर कोणत्यातरी एकाक्षणी त्याला आपण नाममात्र आहोत याची जाणीव होते. स्वतःचे, माझे म्हणताना आपण निमित्तमात्र आहोत याची जाणीव जर माणसाला योग्यवेळी झाली तर तो बऱ्याच दुःखांपासून मुक्त होऊ शकतो. यासाठी समर्थ आपण राहतो त्या घराचे आणि आपल्याला मिळालेल्या मानवी देहाचे दाखले देतात.

*'मृत्तिका खाणोन घर केलें। तें माझें ऐसें दृढ कल्पिलें।*
*परी तें बहुतांचें हें कळलें। नाहींच तयासी।'*

माझे म्हणणाऱ्यासाठी, देहाचे अकारण स्तोम माजविणाऱ्यांसाठी, देहाला कामाला लावण्याऐवजी त्याला जपण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांसाठी समर्थ वरील दाखला देतात. मनुष्य ज्या घराला आपले मानतो त्यात तर माशा, साप, मांजरे, गुरेढोरे, पाहुणे, चोर इ. सर्व हक्क गाजवितात. त्याचप्रमाणे मानवी देहाचेही आहे उवा, कृमी, जंत इ. शरीरावर आपला हक्क गाजवितात त्यामुळे शरीराला विनाकारण कुरवाळित बसण्यापेक्षा त्याला योग्य दिशा देऊन, परमार्थी लावून, उद्योग करून त्याचे सार्थक करावे असा उपदेश करतात.

'स्वगुणपरीक्षा' या दशकात तर समर्थांनी जन्मापासून मृत्यूपर्यंतचा माणसाचा प्रवास, प्रपंचातील शोकनाट्याचा प्रवास सांगताना शेवटी पश्चात्ताप, दुःख, वेदना यांना सामोरे जाण्याचा प्रवास अतिशय परखडपणे सांगितला आहे. डॉ. उमेश तेंडुलकर या संदर्भात म्हणतात, 'अशाश्वत प्रपंचात व्यवहारदृष्ट्या कीर्ती व परमार्थदृष्ट्या आत्मज्ञान उरते. ते शाश्वत आहे. व्यवहारातील एक भावसत्य समर्थ सांगतात.' आयुष्याला सुंदर करण्यासाठी त्याला योग्य दिशा देणे गरजेचे असते तरच मानवी जगण्याचे सार्थक होते. माणसाला हेच कळत नाही. आणि तो अशाश्वत असणाऱ्या गोष्टींच्या मायाजाळात गुरफटून जातो.

*'कोण समयी येईल कैसा । याचा न कळे किं भर्वसा ।*
*जैसे पक्षी दाही दिशां। उडोन जाती।'*

एखाद्या गोष्टीच्या मूळाशी न जाता त्याविषयीच्या अल्पज्ञानाने माणसाच्या संतुष्ट होण्याच्या प्रवृत्तीविषयी ते परखडपणे सांगतात. अशा वागण्याने व्यक्ती आपल्याभोवती एक चौकट आखून घेते ज्यामुळे तिचेच नुकसान होत राहते. कष्ट न करता, खूप काही आणि पटकन मिळावे अशी अपेक्षा बाळगणाऱ्या लालची स्वभावाचे समर्थ दर्शन घडवितात. आयुष्यात कष्टाला, परिश्रमाला असणारे महत्त्व सांगताना व्यवहारातील अनेक दाखले ते देतात.

'आत्मदशकनाम' या दशकातील 'चातुर्यलक्षण' या समासात *'उदंड बाजारी मिळाले। परी तें धूर्तांपासीं आळिले । धूर्तांपासी कांहीं न चले । बाजाऱ्यांचें।'* असे सांगताना धूर्ताला

धूर्त आवडतो. धूर्ताला धूर्तपण कळले की मनास मन मिळायला उशीर लागत नाही. यासाठी नेमके कसे वागावे याचे कौशल्यही ते सांगतात.

*‘वेष धरावा बावळा।अंतरी असाव्या नाना कळा।’*

‘निस्पृहव्यापलक्षण’ या समासात जन्मास येऊन माणसाने कोणती कीर्ती करावी जेणेकरून त्याच्या जगण्याचे सार्थक होईल हे सांगतात. आजूबाजूची परिस्थिती पोषक नसतानाही तीक्ष्ण बुद्धीची व्यक्ती एकही क्षण रिकामा न घालविता आपले कार्य करतो तो लोकांच्या आदराला निश्चितच पात्र ठरतो. समाजामध्ये आपण कोण हे कळू न देता समाजकार्य करतो, लोकांपासून दूर राहून, लोकांवर ताबा ठेवतो, त्यांना शहाणे करण्याचा प्रयत्न करतो. त्याच्याप्रमाणे माणसाने जन्मास येऊन कीर्ती करावी असे समर्थ सांगतात.

*‘ऐसी कीर्ती करून जावें। तरीच संसारास यावें।*
*दास म्हणे हें स्वभावें। संकेतें बोलिलें।’*

ज्याला विवेकाने जगता येत नाही, ज्याला आयुष्यात कीर्ती संपादन करता येत नाही अशा व्यक्तीला कुटुंबात आणि समाजातही मानाने जगता येत नाही. अशा व्यक्तीला सर्वजण दोष देतात.

माणसाच्या अंगी कोणकोणते गुण असावेत व त्यांचा त्याने प्रत्यक्ष वापर कसा करावा याचे अतिशय सूक्ष्म बारकाव्यांसह समर्थ दर्शन घडवितात. उत्तम पुरुष कोणता हे सांगताना तऱ्हेवाईक, शीघ्रकोपी, संकुचित वृत्तीचा मनुष्य शहाणपणाने किंवा समंजसपणाने एखादी गोष्ट जमवून घेण्याला असमर्थ असतो. प्रसंगपरत्वे आपली कृती असावी असेही समर्थ सांगतात. ज्याला जे काम येते त्यातील यशापयश त्यालाच कळते. त्यामुळे लोकात वावरताना वस्तुस्थितीचे भान ठेवून वागावे. एखाद्याचा मुर्खपणा कसा बाजूला करता येईल याविषयीही समर्थ सांगतात. जर चोरालाच भांडारगृहाच्या किल्ल्या दिल्या तर त्याचा चोरी करण्याचा हेतूच बाजूला होऊ शकतो. परोपकारासाठी नेहमी तयार असावे, दुसऱ्याचे ऐकावे, दुसऱ्याविषयी चांगले चिंतावे असे सांगताना जशास तसे वागण्यासही समर्थ सांगतात.

उद्योग करताना हिशोब येणे गरजेचे आहे. तसेच हिशोब येण्यासाठी लिहिता वाचता आले पाहिजे. दुसऱ्यावर विसंबून राहणे योग्य नाही. आपले काम आपण केले पाहिजे, कामाचे मुख्य सूत्र स्वतःकडे ठेवून इतर कामे दुसऱ्यांकडून करून घ्यावीत. पण पूर्णतः दुसऱ्यावर विसंबून राहणे धोक्याचेच.

*‘जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।*
*जो आपणाचे कष्टत गेला । तोचि भला ।’*

दैवावर विश्वास ठेवून समाजात उद्योग न करणारे लोक खूप आहेत त्याच्या वागण्यावर समर्थ नेमके बोट ठेवतात.

'चातुर्यविवरण' या समासात समाजात वावरताना सर्वसामान्य लोकांमध्ये सामान्यासारखा व्यवहार करावा. आपल्या कौशल्याने, चातुर्याने लोकात वावरत असताना आपण काय करतो हे त्यांना कळू न द्यावे. इतरांचे ऐकावे, दुसऱ्यांच्या चालीने चालावे, दुसऱ्याच्या बोलीने बोलावे, थोडक्यात दुसऱ्याचे नकळत अंतर उघडीत जावे. असे सांगताना दुसऱ्याला जाणून घेणे सोपे काम नाही. कधी कधी वाईट शब्दही ऐकावे लागतात. अशा वागण्यानेच *'भूमंडळी सकळांस मान्य। तो म्हणो नये सामान्य।'* माणसाने चातुर्याने सामान्यातून असामान्यत्व प्राप्त करण्याचे कौशल्य सांगतात. प्रयत्न, उद्योगाने खरे शहाणपण येते. त्यामुळे जीवन सुखी होते. '*केलियानें होतें आधीं केलेचि पाहिजे*'. उद्योग करताना बुद्धीचा वापर महत्त्वाचा असतो. तेथे भोळा भाव, संभ्रम या गोष्टींना महत्त्व नाही. याविषयी सांगताना समर्थ म्हणतात, शेत केले पण मशागत नसेल तर, जवाहिऱ्यांचा व्यापार केला पण त्या व्यापारासाठी सगळीकडे फिरलाच नाही तर, जनसमुदाय मिळविला पण तो राखता आला नाही तर मिळविलेल्या गोष्टींना काहीच अर्थ राहणार नाही त्यामुळे ज्या गोष्टी मिळाल्या आहेत त्याचा योग्य तऱ्हेने उपयोग करता आला पाहिजे.

एकूणच दासबोधातून समर्थांची भूमिका ही लोकशिक्षकाची आहे. लोकांना योग्य मार्गदर्शन करणे, त्यांना परमार्थ, भक्ती, तत्त्वज्ञान यांच्याबरोबरीने व्यवहारिक शहाणपण सांगणे, त्यांना माणूस म्हणून जगताना योग्य मार्ग दाखविणे यासाठीच हा सारा प्रपंच मांडलेला आहे असे दिसते. यासंदर्भात गं. बा. सरदार म्हणतात, 'प्रपंचविद्येचे अथवा व्यवहार धर्माचे समर्थांनी आपल्या ग्रंथात जितक्या सुक्ष्मतेने व साकल्याने, आग्रहाने व उत्कटतेने विवरण केले आहे. तितके आधीच्या कोणीही ग्रंथकाराने केलेले नाही हे उघड आहे.' मानवी जीवनातील वास्तव व आशावाद या दोन्ही बाजू समर्थ सांगतात. उत्कंठ, निस्पृह, भव, बुद्धवादी दृष्टीने जे जगण्याकडे पाहताना, प्रपंच आणि परमार्थ यातील समन्वय साधताना, मानवी स्वभावातील सूक्ष्म धागेदोरे उलगडताना, मानव आणि निसर्ग यातील द्वंद सांगताना व्यवहारातील अनेक विषयांना हात घालताना त्यांनी आदर्श मानवाची कल्पना उभी केली आहे. यासाऱ्यातून त्यांचा समाजाकडे पाहण्याचा डोळसपणा दिसतो. त्यामुळे दासबोध हा मानवी जीवनव्यवहाराचा वेध घेणारा ग्रंथ आहे.

'आज्ञापत्र' हा राजनीतीविषयक ग्रंथ रामचंद्रपंत अमात्य यांनी १७१५ साली श्री राजा शंभुछत्रपती यांच्या आज्ञेवरून लिहिलेला आहे. ९ प्रकरणांच्याआधारे अमात्यांनी या ग्रंथातून राजनीतीच्या वेगवेगळ्या अंगांना स्पर्श केलेला आहे. पहिल्या दोन प्रकरणातून स्वराज्यस्थापना, छ. शिवाजी महाराजांचे कर्तृत्व, पुढे शंभुछत्रपतीपर्यंत साम्राज्याचे वास्तव चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. तिसऱ्या प्रकरणापासून पुढे नऊ प्रकरणापर्यंत राजाच्या अंगी कोणती कौशल्ये असावीत, राजाने सेवकाची नेमणूक करताना कोणती काळजी घ्यावी याविषयीचे विवेचन येताना दिसते.

तिसऱ्या प्रकरणात राजाने घ्यावयाची दक्षता, राजाने सेवकाशी कसे वागावे, त्याची निवड कशी करावी तसेच निवड करताना कोणती दक्षता घ्यावी, त्याची कर्तव्ये यांची जाणीव करून दिलेली आहे. सेवकांची निवड करताना ते विश्वासू, प्रामाणिक आहेत की नाही याची चौकशी करावी. सेवकाविषयी संशय आला तर त्याचा उघडपणे बोलबाला न करता त्याने केलेला गुन्हा शासनयोग्य असल्यास त्याला शासन करावे. नाहीतर त्यास आहे त्या कामावरून दूर करून इतर सेवा सांगावी. जेणेकरून सेवक राजाशी एकनिष्ठ राहील, राजाविषयी काहीही चुकीचे इतर ठिकाणी बोलणार नाहीत. तसेच काही गैरकामही त्याच्या हातून घडणार नाही. सेवकाने उत्तम कामगिरी बजावली तर त्याचे कौतूक करावे.

*'ज्याने जो गुण कळून तद्नुरूप त्याचे श्रमाचे सार्थक करावे.'*

राजाला कोणासमोर काय बोलावे याचे भान असावे. राजाने नेहमी उद्योगी रहावे. राज्याच्या खजिन्याकडे लक्ष द्यावे.

*'पडलें प्रसंगीं खजीना असल्यानें सर्व संकटांचा परिहार केला जातो'*

सेवकांचे वेतन बिनचूक आणि वेळेवर द्यावे. एखाद्या सेवकाने विशेष कार्य केले तर त्याला बक्षीस द्यावे पण ज्यादाचे वेतन देऊ नये त्यामुळे इतर सेवकांमध्ये गैरसमज होऊन राज्याची आर्थिक घडी बिघडू शकते. राजाने हुजरातीवर नेमलेले सेवक हे जनतेच्या पसंतीला उतरलेले असावेत. तसेच जनतेत त्यांचा दराराही असावा. त्यांच्यात बेंबंद माजू नये म्हणून त्यांचा पगार वेळेत द्यावा.

*'आपल्या हितकार्यावर दृष्टी ठेवून, साधारण मनुष्य आणि कार्यकर्तेंही उद्योगी त्यांस नावाजून त्यांची भीड स्वतां वागवून, जेणें करून आपलें हितकार्य होय तें करावें'*

माणसाने आपल्या मर्यादेप्रमाणे वागावे असे आज्ञापत्र सांगते. ही मर्यादा कधी राजाची आहे तर कधी सेवकाची, महत्त्वाच्या अधिकाऱ्यांची, तर कधी सूक्ष्म विचार केला तर ही मर्यादा प्रत्येक व्यक्तीची आहे. राजाही माणूस आहे त्याच्यातही गुणदोष असू शकतात पण त्याने ते दोष बाजूला केले पाहिजेत. राजाने नेहमी कार्यतत्पर असावे.

*'वृक्षाचें मूळ दृढ सोदत भूमीत वृक्षाचे विस्तारातें पावतें, तद्वत् राज्यमूळ नृप, तो गुणवंत तें राज्य विस्तारातें पावतें.'*

चौथ्या प्रकरणात प्रधानाचे महत्त्व येते. सरकारकून निवडताना कोणकोणत्या गोष्टी राजाने ध्यानात घ्याव्यात हे सांगितले आहे. त्याच्याकडे असणारे गुण, युक्तीने त्याच्या दोषांचे निरसण करणे का गरजेचे आहे याचे विस्तृत वर्णन येते. पाचवे प्रकरण व्यापार वृद्धीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. साहुकारांमुळे राज्यात न मिळणाऱ्या वस्तू उपलब्ध होतात. त्यामुळे राज्य तर श्रीमंत होतेच पण त्याचबरोबर वेळप्रसंगी कर्जही मिळते. साहुकारांचा विशिष्ट कार्यक्रमाच्या निमित्ताने मानसन्मान करावा. पण जे परकीय व्यापारी आहेत त्यांना व्यापारापुरती ये-जा करण्यास मुभा द्यावी त्यांना जागा देऊ नये. त्यांच्यापासून भविष्यात

धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे त्याच्याशी व्यवहार करताना खबरदारी घ्यावी. सहाव्या प्रकरणात वतनदारांविषयीची माहिती येते. सातव्या प्रकरणात कोणाचाही वृत्त्यपहार कधी करू नये असे सांगितले आहे. उदरनिर्वाहाची साधने कुणाकडून काढून घेऊ नयेत, ती एकाची दुसऱ्यास देऊ नयेत, तसेच नवी साधने देताना ती जमिनीच्या रूपात देऊ नयेत. कारण त्यामुळे जमीनमहसूलामध्ये न्यूनता येऊ शकते. वस्त्र, भूषण, अश्व या स्वरूपात ती द्यावीत.

आठवे प्रकरण दुर्गाविषयी आहे. तर नववे प्रकरण आरमारविषयक आहे. इतर ठिकाणी माणसे नेमताना जशी खबरदारी आज्ञापत्रात घ्यायला सांगितली आहे तशीच दुर्गावर माणसे नेमताना घेणे गरजेचे आहे. गडावर एखादा अधिकारी जर मृत्यू पावला तर त्याच्या मूलाला किंवा भावाला त्यांच्या कुवतीनुसार उद्योग द्यावा. एखाद्याने गुन्हा केल्यास त्याचा शिरच्छेद करून त्याचे शीर इतर गडावर फिरवावे कारण पुन्हा कोणी असा गुन्हा करण्यास धजावणार नाही. कामावर दुर्लक्ष होऊ नये म्हणून ओळखीच्या व्यक्तींना वेगवेगळ्या ठिकाणी ठेवावे. स्वच्छतेविषयीचे जे सांगितले आहे. त्याचा विचार आजही आपण करण्यासारखा आहे. गडावर असणारा पाण्याचा साठा, घरांची स्वच्छता, कचऱ्याची योग्य विल्हेवाट, वृक्षतोड न करणे, झाडांचे जतन इ. अनेक गोष्टी त्याकाळात जरी सांगितल्या तरी आजच्या काळातही त्या आपल्याला उपयुक्त आहेत. दासबोध आणि आज्ञापत्रातून प्रामुख्याने आजच्या प्रशासनव्यवस्था, मोठमोठ्या कंपन्यांसाठी, उद्योगधंद्यासाठी, आपल्या रोजच्या व्यवहारासाठी घेण्यासारख्या खूप गोष्टी आहेत. व्यक्तीकडे असणारे उत्तम गुण, परिश्रम, कार्यतत्परता, हजरजबाबीपणा, नेतृत्त्व करण्याचे कौशल्य, सामान्यात राहूनही असामान्यत्व प्राप्त करण्याचे कौशल्य, प्रयत्नवादी, आशावादी, वेळेचे नियोजन, कामाचे व्यवस्थापन, सांघिकपणे काम करण्याची पद्धत आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे कामाची आखणी करताना भविष्यात या गोष्टींचा होणारा परिणाम थोडक्यात सगळ्याच गोष्टीतील दूरदृष्टीपणा याविषयीचा अतिशय प्रभावी आणि उपयुक्त असे विचार आले आहेत.

समाजाचा महत्त्वाचा घटक म्हणून आपल्याला योग्य तऱ्हेने जगता आले पाहिजे किंबहुना आपण माणूस म्हणून योग्यपद्धतीने जीवन व्यतीत केले पाहिजे. त्यासाठी काही व्यवहारिक कौशल्यांचा आपण स्वीकार जाणीवपूर्वक केला पाहिजे हेच सत्य 'दासबोध' आणि 'आज्ञापत्र' या ग्रंथांच्या माध्यमातून सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. लोकांचा इतरांशी व्यवहार कसा असावा, उद्योगी बनण्यासाठी कोणत्या गोष्टींचा त्याग करावा, कोणत्या चांगल्या गोष्टींचा स्वीकार करावा, व्यवहार चातुर्य, आचरण कसे असावे, परमार्थ आणि प्रपंच करताना कोणत्या गोष्टींचे भान असावे, तत्त्वज्ञान इ. अनेक विषयांना घेऊन 'दासबोध' येतो. प्रयत्नवाद, सावधानता, उत्तम आचरण, प्रपंच आणि परमार्थ साधताना कोणत्या गोष्टी लक्षात घ्याव्यात हे रोजच्या व्यवहारातील दाखले देवून व्यक्तीच्या जगण्याला योग्य

आकार देण्याचा केलेला प्रयत्न कोणत्याही काळात मार्गदर्शकच आहे. तर आज्ञापत्रातून राजाचे, सेवकाचे वर्तन सांगितले असूनही हे वर्तन सर्वसामान्य लोकांना रोजच्या व्यवहारासाठीही उपयुक्त ठरताना दिसते. लोकांचा व्यवहार, त्यांचे वर्तन हे सांगताना समर्थ वेगवेगळी उदाहरणे देतात. दोन्ही काळात उद्योगाविषयी असलेली जागृकता स्पष्ट होते. एखादी गोष्ट मिळाली की समाधानी न होता त्या गोष्टीचा पाठपुरावा केला पाहिजे. उद्योग उभारून तो व्यवस्थित टिकविता आला पाहिजे, वाढवता आला पाहिजे आणि यासाठी आवश्यक त्या साऱ्या कौशल्यांचा व्यक्तीने वापर केला पाहिजे. आपण लोकांच्यात राहून आपले कार्य कसे साधावे, लोकांच्या पसंतीला कसे उतरावे यासाठी महत्त्वपूर्ण सूचना मोठ्या कौशल्याने सांगतल्या आहेत. इतरांमध्ये असूनही त्यांच्यापासून अलिप्त राहून आपले कार्य कसे साधावे, विचारपूर्वक परिस्थितीला हाताळावे अशी अनेक व्यवहार कौशल्ये समर्थ अगदी सहजपणे सांगतात. व्यापारासाठी आज्ञापत्रातून दिसून येणारी व्यापारनीती, उद्योगाच्या वृद्धीसाठी आखायच्या व्यूहरचना, मिळविलेल्या गोष्टीचे व्यवस्थित जतन, संवर्धन करण्याचा विचार, कार्यतत्पर राहणे, उद्योगशील असणे, पुढचा विचार करून अतिशय हुशारीने उद्योग वाढविण्याचा प्रयत्न आज्ञापत्रातून सांगितला आहे.

दासबोध आणि आज्ञापत्र हे दोन्ही ग्रंथ आजच्या जागतिकीकरणाच्या युगात माणसाला व्यवहारकौशल्याचे, नियोजनाचे, व्यवस्थापनाचे धडे देणारे आहेत. समर्थ रामदास केवळ परमार्थ सांगत नाहीत तर प्रत्येक काळाशी सुसंगत असे व्यवहार ज्ञान, तत्त्वज्ञान सांगताना दिसतात. माणसाकडे कोणते चांगले गुण असावेत हे सांगताना वेगवेगळ्या गुणांचा उल्लेख करतात. तर अशाच चांगल्या गुणांच्या सेवकांना सेवेत रूजू करण्याविषयी आज्ञापत्र सांगते. केवळ परमार्थ केल्याने, देवावर विसंबून राहिल्याने काही होणार नाही त्यामुळे आळस बाजूला करून कार्यतत्पर, उद्योगी बनले पाहिजे. ही कार्यतत्परता, उद्योगीवृत्ती आज्ञापत्रातही दिसून येते. समर्थ एखादी गोष्ट मिळविली तर ती व्यवस्थित सांभाळता आली पाहिजे असे सांगतात. हा विचार आज्ञापत्रातही येतो. माणसाने आयुष्यात सावधानता बाळगली पाहिजे. प्रत्येक गोष्टीपासून खबरदारीने राहिले पाहिजे. याच वस्तुस्थितीचा निर्देश आज्ञापत्रातही केला आहे. दोन्ही ग्रंथातील असे काही विचारातील साम्य दाखविता येते.

आज आपल्याला प्रत्येक क्षेत्रात कामाच्या नियोजनाला, व्यवस्थापनाला असलेले महत्त्व आणि किती कौशल्याने तुम्ही या साऱ्या गोष्टी हाताळू शकता हे जाणण्याचा केलेला प्रयत्न दिसतो. खरं तर कामाचे नियोजन, व्यवहारातील कौशल्ये म्हणजे सावधानता, दक्षता, कुशलता, हुशारी, हाताखालच्या लोकांशी कसा व्यवहार करावा, त्यांचे मन जिंकण्याचा, त्यांना खुश ठेवण्याचा प्रयत्न कसा करावा, जेणेकरून त्यांच्या हातून काम व्यवस्थित होईल, वरिष्ठांशी ते एकनिष्ठ राहतील अशी काही कौशल्ये दासबोध आणि आज्ञापत्रातून सांगताना रोजच्या व्यवहारातील दाखले दिले गेले आहेत. जे कोणत्याही काळात व्यवहारिक पातळीवर

समर्पक असेच आहेत. आजच्या काळात या व्यवहार कौशल्यांचा वापर तर गरजेचाच आहे पण त्याचबरोबर समाजाचा एक घटक आणि माणूस म्हणून समाजात वावरताना वरील गोष्टी ध्यानात ठेवणे गरजेचे आहे. कारण काळ बदलला तरी विचार कायमस्वरूपी जिवंत असतात. त्यांना आत्मसात करणे गरजेचे असतात.

**संदर्भ ग्रंथः**


१. कामत अशोक : *श्री समर्थ रामदासस्वामीकृत : श्रीमत् दासबोध*, गुरुकुल प्रतिष्ठान, पुणे, २००८.

२. जोगळेकर यशवंत : *समर्थांच्या विविध विचारशलाका*, मधुश्री प्रकाशन, पुणे, २०१०.

३. फाटक न.र. : *रामदास वाङ्मय आणि कार्य*, मौज प्रकाशन, मुंबई, २०११.

४. तेंडुलकर उमेशः *दासबोधःवाङ्मयीन समीक्षा*, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९८.

५. जोशी प्र. न. (संपा.) : *आज्ञापत्र (अमात्यकृत)*, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९९७.

६. ढेरे रा. चिं. (संपा.) : *रामचंद्र अमात्य प्रणीत स्वराज्यनीती*, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००५.